# संत नामदेव : व्यक्तित्व, कर्तृत्वआणि कवित्व

**प्रा. डॉ. केशव पाटील**
मराठी विभाग,
शाहीर अण्णा भाऊ साठे महाविद्यालय, मुखेड

तेरा ते सतराव्या शतका दरम्यान मराठी संतसाहित्याने महाराष्ट्राची जडणघडण केली. मुठभर लोकांच्या हाती असलेले ज्ञान संतांच्या अभंग-ओवीने जनसामान्यांच्या पदरात टाकले. मुक्यांना बोलते तर अपंगांना लिहिते केले. दरम्यानचा काळ हा अंध:कारमय होता. त्याला प्रकाशमान करण्यासाठी अनेक संतांनी आपले कर्तृत्वआणि कवित्व सिद्ध केले आहे. अज्ञान, रूढी, परंपरा, ब्राह्मणी सनातनी वृत्ती, चातुर्वर्ण्य व्यवस्था, वृत्ते, उपवास, कर्मकांड, स्त्री-पुरुष असमानता, पुरुषी अहंकार, अस्पृश्यता इ.कारणांनी येथील धर्म आणि समाजव्यवस्था गढूळ झालेली होती. उच्च-नीचतेच्या छायेखाली येथील समाज बरबटून गेला होता. ग्रंथातील ज्ञान हे केवळ आमच्यासाठी, विशिष्ट जातीसाठी आहे. आम्ही म्हणेल तोच धर्म.या अहंकारी वृत्तीचेपीक गाजर गवताप्रमाणे जोमात वाढले होते. त्यामुळे एकूण समाज अध:पतनाकडे वाटचाल करीत होता. अशा वातावरणात परिवर्तन होणे काळाची गरज होती. पसरलेला अंधार दूर करण्यासाठी समाजप्रबोधन आणि ज्ञानदीपाची आवश्यकता होती. हेच नेमकेपणा अधोरेखित करून ज्ञानियांचा राजा संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढरोवली. म्हणून त्यांना वारकरी संप्रदायाचे दाते म्हणतात. संत नामदेव, गोरा कुंभार, विसोबा खेचर, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा इत्यादी समकालीन संतांचे नेतृत्व करत संत ज्ञानेश्वरांनी अध्यात्माच्या क्षेत्रात जनसामान्यांना न्याय देऊन समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. ही परंपरा पुढे वारकरी संप्रदायातील लहान थोर संतांनी आपल्या कर्तृत्व आणि कवित्वातून चालवली. पुढे जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी **"जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा ।"** म्हणतं जनसामान्यांची सेवा करीत ईश्वर भक्तीचा मार्ग सुगम, सुखकर, समान,सन्मानपूर्वक आणि आनंददायी करून दिला. म्हणून **"पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरु तुकाराम महाराज की जय."** असा त्यांच्या कर्तृत्वाचा, कवित्वाचा जयघोष आजही होतो.

नामदेवांचा जन्म निश्चित कधी झाला याविषयी अभ्यासकात एकमत नाही. परंतु त्यांचा कार्यकाळ इ.स. १२७० ते १३५० असा सांगितला जातो. यावरून नामदेवांना ८० वर्षाचे दीर्घ यशस्वी आयुष्यमान लाभले होते. त्यांचा जन्म वडील दामाशेट्टी आई गोणाई यांच्या पोटी शिंपी घराण्यात झाला. नामदेवांचे पूर्वज विठ्ठल भक्त व पंढरीची नित्य वारी करणारे होते. परंपरेने कपडे शिवण्याचा व्यवसाय जसा त्यांच्या घराण्यात चालत आला; तशी पांडुरंगावरील एकनिष्ठ श्रद्धा आणि भक्तिही त्यांच्या घराण्यात पिढ्यानपिढ्यापासून चालत आलेली होती. घरात भक्तीमय वातावरण होते. नामदेवांच्या जन्म गावाविषयी मतभेद आहेत. परंतु पुर्वीचा परभणी आणि सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव हे नामदेवांचे जन्मस्थळ असल्याचे मानले जाते.

नामदेवांचा विवाह आठव्या वर्षी राजाई नावाच्या मुलीशी झाला. "नामदेवांचे पुत्र नारा, महादा, गोदा व विठ्ठा, बहीण अऊबाई, मुलगी लिंबाई, चारही मुलांच्या बायका, जनाबाई ही त्यांची निष्ठावंत सेविका (दासी) व विसोबा खेचर हे त्यांचे सिद्ध गुरु होत." असे त्यांचे एकत्र मोठे कुटुंब होते. त्यांना लहानपणापासूनच

विठ्ठल भक्तीचे वेडे होते. ही विठ्ठल भक्ती दिवसेंदिवस वाढत गेली. त्यात ते अधिकच रमून गेले. रीती-रिवाजाप्रमाणे व्यवसाय करून संसार करावा असे त्यांना कधीच वाटत नसे.त्यांची आई आणि कुटुंबाची तीव्र इच्छा असूनही नामदेव कुटुंबात कधी रमलेच नाही. कौटुंबिक जिम्मेदारीचे ओझे त्यांनी न स्वीकारता विठ्ठल भक्तीत एकरूप होऊन संसारापासून ते नेहमीच अलिप्त राहत. त्यामुळे त्यांचे कुटुंब आर्थिक विवंचनेत राहत असत. नामदेव **"देह जावो अथवा राहो l पांडुरंगी दृढभाव "** या दृढनिश्चयाने कीर्तन आणि भजनात रमत गेले. कौटुंबिक विरोध पत्करून, संसाराचा त्याग करून केवळ ईश्वर भक्ती, नामस्मरण आणि भक्तिकाव्यात कायमचे ते रंगून गेले.

संत परंपरेत नामदेवांचा अत्यंत उत्कट मनाचा, कष्टी व्यथित मनाचा, भावभक्त कवी म्हणून उल्लेख केला जातो. ज्ञानदेव आणि नामदेव हे समकालीन श्रेष्ठ दर्जाचे कवी होते. ज्ञानदेव ज्ञानाचा तर नामदेव भक्तीचा राजा होते. ज्ञानदेव हे नामदेवांचे गुरुस्थान होते. नामदेवांचा स्वभाव भावनाप्रधान होता. ते हट्टी स्वभावाचे होते. बालपणात त्यांनी मंदिरातील देवाला नैवेद्य खाण्यासाठी आग्रह धरला आणि देवाने त्यांचा बालहट्ट पूर्ण केला. अशी त्यांच्याविषयीची आख्यायिका प्रसिद्ध आहे. नामदेव हे विरक्तवर्तीचे होते. ते भक्तिप्रधान असल्यामुळे अंतर्मनातून ईश्वराशी एकरूप होत असत. त्यांच्यातील भाव वेडेपणा त्यांच्या अभंगातून अनेक वेळा जाणवतो. "आपल्या अभंगवाणीच्या रूपाने त्यांनी वाचकांशी सख्यत्व जोडले. त्यांची अभंगवाणी म्हणजे त्यांच्या भाववेढ्या उद्गात, प्रसन्न,सोज्वळ आणि निष्पाप अशा व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार होय."

संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि त्यांच्या समकालीन संतांनी जी साहित्य निर्मिती केली. तीच वारकरी संप्रदायाची प्रेरणा व विचारसरणी आहे. ही विचारसरणी पंढरपुरापासूनपंजाबात आणि पंजाब पासून सबंध उत्तर भारतात प्रथम कोणी नेली असेल तर ती संत नामदेवांनी. नामदेव हे भगवदगीतेचे चांगले अभ्यासक होते. ज्ञानेश्वरीचा प्रभाव त्यांच्यावर होता. भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन त्यांनी उत्तर भारतात अनेक तीर्थयात्रा केल्या. या दूरदूरच्याप्रवासात अनेक स्थळी त्यांनी कीर्तने, भजन केली. या प्रवासाच्या निमित्ताने त्यांनी अमराठी भाषिक प्रांतात जाऊन आपल्या अभंग व कीर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्माचे तत्त्वज्ञान आणि मानवी जीवनमूल्यांची कृतिशील पेरणी केली. मराठी भाषेसह त्यांनी हिंदी भाषेतूनही काव्य लेखन केले आहे. या लेखनातील ६१ ईश्वर भक्तिपर रचनांचा समावेश शिखांच्या धर्मग्रंथात झालेला आहे. हे नामदेवाचे कर्तृत्वगौरवास्पद असून त्यांनी यातून आपले कवित्व सिद्ध केले आहे. ते अविस्मरणीय आहे.

संत नामदेव हे उत्तम संघटक होते. भक्तांना आपलेसे करून त्यांच्या अंतर्मनाचे ठाव घेण्याचे कुशल नेतृत्व त्यांच्या अंगी होते. नामदेवांनी जेव्हा उत्तर भारतात परिभ्रमण सुरू केले त्यावेळी तेथील परिस्थिती भयावह होती. मुसलमानांच्या आक्रमणातून हिंदूंचीतीर्थक्षेत्रे नष्ट होत होती. तेथील धार्मिक जीवन उध्वस्त होत होते. त्यामुळे हिंदू समाज भीतीच्या दडपणाखाली जगत होता.त्यांना धीर देणे, धर्म आणि संस्कृती टिकून ठेवणे काळाची गरज होती. नामदेवांचा भक्तीभाव आणि कीर्तन करण्याची कला या त्यांच्या गुणामुळेपंजाबात त्यांनी भागवत धर्माचा विचार सर्वत्र पेरला.त्यांच्या विचारांचा प्रभाव समाजमनावर उमटू लागला. "कबीर, नानक, रामानंद, रोहिदास वगैरे पंजाबातील संतांनी नामदेवाकडून भक्तीची दीक्षा घेतली.त्या सर्वांनी आपापल्या काव्यातून नामदेवांचा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे." पंजाब आणि राजस्थान येथे नामदेवांची मंदिरे बांधली आहेत. पंजाबात शिंपी समाज बऱ्या प्रमाणात असल्यामुळे तेथे आज "नामदेव सांप्रदायी" म्हणून

ओळखला जातो. गुजराती संत नरसी मेहता यांनी नामदेवांना "थोरभक्त" म्हणून संबोधले आहे. नामदेवांना **"भक्त शिरोमणी"** म्हटले जाते. ते त्यांच्या कवित्व आणि कर्तृत्वामुळेच पंजाबातील गुरुदासपूर जिल्ह्यात घुमान येते संत नामदेवाचे प्रसिद्ध मंदिर आहे. "बहोरदास, त्रिलोचन, विष्णूस्वामी, जल्लो सुतार, लध्धा खत्री, केसो कलंदर हे नामदेवांचे पंजाबमधील प्रमुख शिष्य असून त्यांनी नामदेवांची भक्ती परंपरा पुढे चालवली आहे. "

**"अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णूदासा भाविकांसी ।**
**नामा म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग ।"**

कुणालाही अहंकाराचा वारा लागू नये. म्हणून नामदेवांची भाषा तळमळते. मोठ्या कळवल्याने त्यांची भाषा चिंतन करते. कृतज्ञता हा व्यक्तीचा मोठा सद्गुण आहे. म्हणून 'मी'पणा, गर्व गळून पडो ही नामदेवांची विचारसरणी आहे.

संत साहित्याच्या परंपरेत मराठी भाषेतून अभंग रचना करण्याचा पहिला मान नामदेवाकडे जातो. मराठी कवितेतील पहिली भावकविता संत नामदेवांनी लिहिली. म्हणून त्यांना आद्य भावकवी असे म्हणतात. मुळात नामदेवांचे व्यक्तिमत्त्वच भाववेडे होते. ते नेहमी सगुण भक्तीत रमून जात असत. कीर्तन हा त्यांचा आवडता कलाप्रकार होता.भाव मनातील सगुण भक्तिभाव ते आपल्या श्रोत्यांना कीर्तनातून रंगून सांगत असत. त्यांची अभंगवाणी म्हणजे प्रसन्न, उदात्त आणि सोज्वळतेचा परिपाक होता. त्यांनी किती अभंगांची रचना केली यापेक्षा त्यांच्या अभंगातील पांडुरंगा विषयीची श्रद्धा, त्यांच्या वरील भावदृष्टी आणि समाजातील माणसांविषयीचा कळवळा लक्षवेधी आहे. नामदेवांची कविता सर्वसामान्य माणसांच्या अंतर्मनाला भिडणारी असून त्यात भक्तीभाव तर ओसांडून वाहतोच शिवाय ती शांत, संयमी आणि करुणेने ओतपोत भरलेली आहे.

**"नामयाचे बोलणे नव्हे रे कवित्व । हा रस अद्भुत निरूपण ।"** नामदेवांच्या वाणीत केवळ अद्भुत रस ओतप्रोत भरून राहिला आहे; एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वरीत आणि ज्ञानदेवांच्या अभंगात ज्या भक्ती रसाचा साठा भरून ठेवला होता. तो आता नामदेवांच्या अभंग-सरितेच्या दोन्ही पात्रातून ओसांडून वाहत आहे. शांत, अद्भूत आणि करुण या रसांनी भिजून चिंब झालेली नामदेवांची कविता भक्तीरसाने अक्षरशः न्हाऊन निघाली आहे. "ज्ञान आणि नाम या दोन्हीचा शुद्ध, पवित्र संगम झालेला आहे. ज्ञान आणि नामभक्तीच्या संगमातून **"नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातले नामयाणे ।।"** ही ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या ज्ञान-नामभक्तीचे आदयुक्त चित्रण या काव्यातून प्रकटते. नामदेव हे प्रेमाचे भुकेले आणि अंतरीचे भक्त होते. यातूनच त्यांची भावकविता फुलत गेली.

नामदेवांना कवित्वाचे स्मरण कसे झाले ? त्यांना कवित्वाची प्रेरणा कशी मिळाली ? याविषयी ते चरित्रपर अभंगात म्हणतात-

**"चंद्रभागेतीरी आयकिल्या गोष्टी । वाल्मीके शतकोटी ग्रंथ केला ।।**
**माझिया चितासि फार झाले क्लेश । वृथाम्या आयुष्य गमविले ।।**
**जाऊनि राऊळा विठोशी विनविले । वाल्मीकाने केले रामायण ।।**
**असेन मी खरा भक्त तुझा देवा । सिद्धीस हा न्यावा पण माझा ।।**
**शतकोटी तुझे करीन अभंग । म्हणे पांडुरंग ऐक नाम्या ।।**

**तयावेळी होती आयुष्याची वृद्धी। आतांचि अवधि थोडी असे ।।**
**नामा म्हणे जरी न होता संपूर्ण । जिव्हा उत्तरीण तुजपुढे।।"**

चंद्रभागेच्या काठावरील रामायणाच्या कथा,वाल्मीकांच्या ओवीतील कवित्वाचे स्फुरण आणि प्रत्यक्षात भक्तिभवाने पांडुरंगाला घातलेले साकडे व पांडुरंगाने दिलेले आशीर्वाद हेच त्यांच्या मते त्यांच्यातील कवित्वाची प्रेरणा आहे. गुरु विसोबा खेचर यांनी दाखवलेली अज्ञारुपी वाट आणि त्या वाटेवरून चालताना मिळालेली हरिकृपा यातूनच संत नामदेव 'शीघ्रकवी ' बनले.

नामदेवांचे संपूर्ण कुटुंबच कवितेत रंगलेले असल्यामुळे नामदेव बालपणापासूनच कवितेच्या मळ्यात खेळत होते. नामदेवांची आई गोणाई उत्तम काव्यरचनाकार होती. तिने नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आत्मचरित्रात्मक अभंगातून लिहिले आहे. नामदेवांची दासी संत जनाबाईंनी साडेतीनशे अभंग लिहिले. त्यातही नामदेवांच्या स्वभाव गुण विशेषांचे संदर्भ सापडतात. आऊबाई (बहीण) लडाई व साखराई (सुना) या नामदेवांच्या कुटुंबातील स्त्रियांच्या नावे अभंगरचना सापडते. एकूणच नामदेवांच्या घरात काव्य लेखनाचे पीक ब-यापैकी आल्याचे दिसून येते. ही काव्यरचनेची परंपरा बालपणापासूनच लाभल्यामुळे नामदेवांच्या अभंगातून ज्ञान आणि भक्ती यांच्या संगमातून वांङ्मयीन मूल्यांची निर्मिती झालेली आहे.

नामदेवांनी वाल्मिकीची प्रेरणा घेऊन शतकोटी अभंग रचना करण्याचा संकल्प रचला असला तरी त्यांच्या नावे आज अडीच हजारच अभंग सापडतात. त्यांच्या अभंगातून वाचकांना अंतर्मुख करणारी भावदृष्टी आणि सहज,साधी, सरळ आणि सोपी श्रद्धाभक्ती ओसंडून वाहते. त्यांच्या काव्यातून सजगता येत नसली तरी एकमेकांच्या सुखदु:खाच्या गोष्टी नामदेव सहजतेतून, संवादात्मकतेतून सांगतात. सावध करतात. विश्वाचे कल्याण व्हावे, अहंकार, मोह टाळावा आणि प्रेमस्वरूप पसरावे. हा शुद्ध भाव **'नामयाच्या वाणीतून'** वाहतो आहे.

'तीर्थावळी'त नामदेवांनी ज्ञानेश्वराच्या सोबत केलेल्या तीर्थयात्रेची हकीकत सांगितली आहे. 'समाधी' प्रकरणातील काव्यातून नामदेवांची व्याकुळता, भावमधुरता आणि साक्षात अनुभूती यांचा संगम झाल्यामुळे हे कवीचे कवित्व हृदयस्पर्शी झाले आहे.

**" कासावीस प्राण मन तळमळी । जैसी का मासोळी जीवनाविण ।।**
**दाही दिशा वोस वाटती उदास । करिताती सोस मनामाजी ।। "**

किंवा

**"कोण जाणे माझे जीवीचा कळवळा । प्रेमाश्रू डोळा लोटताती ।।**
**नामा म्हणे येथे बोलवेना मज । जातसे निजगुज आवडीचे ।। "**

आत्मनिवेदनपर अभंगातून नामदेवांच्या अंतर्मनातील भावदर्शन घडते. त्यांच्या मनातील उत्कटता, संयम, प्रेम, ओढ यांचा इथे संगम झाला असून नामदेव नेहमी भाववेड्या श्रद्धेतून **"माझे मनी ऐसे होतसे गा देवा । देह समर्पावा तुझे पायी ।।"** म्हणतात.परंतु त्यांचे संसारिक मन ' मन वढाय,वढाय ' प्रमाणे संसारिक वासनेकडे परतून येण्याचा प्रयत्न करते. अशावेळी नामदेव तेवढ्याच ताकदीने मनातील क्षणिक भावनांचा निषेध करतात. **"अरे मना मर्कटा । पापिया चांडाळा लंपटा । परद्वार हिंडंशी सुनाटा । अरे पापी चांडाळ ।"** हा समाज ढोंगी, पापानी बरबटलेला आहे.सर्वत्र वृत्त-वैकिल्ये, सनातनी वृत्ती, माणसा-माणसातील भेदाभेद, कर्मकांड, जातीभेद

या अशा अनेक कारणांनी समाज नाशिवंत झाला आहे. म्हणून "**विठ्ठला ! माझे भेटीचे मनोरथ तू पूर्ण कर. मला उदास करू नको.**" असे ते भगवंताला कळकळीने विनंतीपूर्वकम्हणतात.

संत नामदेव श्रेष्ठ दर्जाचे भावकवी, चरित्र-आत्मचरित्रकार, आख्यान कवी, भागवत धर्माचे प्रचारक, प्रसारक, संघटक होते. वारकरी संप्रदायातील आजच्या कीर्तन परंपरेचा पाया नामदेवांनी रचला. कीर्तनाला त्यांनी सबंध भारतात पोहोचविले. अभंग आणि कीर्तन यांचा नामदेवांच्या कर्तृत्वातसंगम झालेला होता. या संगमाच्या प्रवाहातून नामदेवांनी अनेक शिष्यांची परंपरा निर्माण केली. आपल्या शिष्यांची समाधी बांधणारे गुरु म्हणून नामदेवांचा लौकिक आहे.अशा नामदेवांचे व्यक्तित्व, कर्तृत्व आणि कवित्व अलौकिक आहे." आपल्या काव्यनिर्मितीच्या आणि आचरणाच्या द्वारे नामदेवांनी समाजाला मानवता, भूतदया, शांती, सर्वाभूतीप्रेमभाव, संत महात्म्यातून आदर्श व्यक्ती आणि भक्त यांची महती शिकविली. निरागसता, कोमलता, मनाचे औदार्य आणि विशालता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता. नामसंकिर्तन आणि विठ्ठल प्रेम हे त्यांचे खरे मार्ग होते. त्यामुळे उच्च-कनिष्ठ जातीतील भक्त एकत्र आले. त्यात स्त्रियाही आल्या. समाजाच्या अठरापगड जातीतील संत एकत्र आले आणि त्यांनी अभंग रचना केली." हे सर्व घडले ते नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वामुळे, कर्तृत्वामुळेआणि त्यांच्यातील कवित्वामुळेच. हे महाराष्ट्राला कधीही न विसरता येण्यासारखे आहे. नामदेवांनी महाराष्ट्राचीच नव्हे तर देशाची जडणघडण केली. मानवतेच्या धाग्यात माणसांना गुंफण्याचे महान कार्य केले आहे. नामदेवांच्या अशा कार्य, कर्तृत्वाआणि कवित्वा विषयी संत ज्ञानेश्वर लिहितात

**" भक्त भागवत बहु सालऐकले । बहु होऊनि गेले होती पुढे ।**
**परी नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व । हा रस अद्भुतनिरुपम । "**

? ▪ ▪

**संदर्भ :**


१) *प्रा. डॉ. गजानन जोशी - महाराष्ट्र संत (भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास - खंड-०७), शुभदा सारस्वत, प्रकाशन, पुणे, आ. १९९४.*

२) *माधव गोपाळ देशमुख- भारतीय साहित्याचे निर्माते-संत नामदेव, साहित्य अकादमी, प्रकाशन.*

३) *श्री.दा.न.शिखरें - संतकवि ('मराठीचे पंचप्राण' साहित्य माला), जयन्त आणि कंपनी, प्रकाशन, पुणे. आ. १९७४*

४) *ल.रा.नसिराबादकर- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर आ. २००६*

५) *प्रल्हाद लुलेकर,सतीश बडवे-(संपा.)-मराठवाड्यातील साहित्य,(मराठवाड्यातील संतांचे सामाजिक आणि वाङ्मयीन कार्य. अशोक देशमाने) कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. आ. २००७*